**शिक्षणाधिकारी**
**माध्य मिक व तांत्रिक शिक्षण कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**भाऊसाहेब शिरोळे भवन,शिवाजीनगर,पुणे४११००५**

## जाहिर प्रकटन

**पुणे महानगरपालिकेची राजीव गांधी ॲकॅडमी ऑफ ई–लर्निंग स्कूल (सी.बी.एस.ई.बोर्ड), शिवदर्शन, पुणे ४११००९.**
**या शाळेतील ज्युनिअर केजी दोन तुकड्यांच्या ८० जागेसाठी**
**सन २०१४ – १५ या वर्षासाठी प्रवेशाचे जाहिर प्रकटन**

१) दिनांक १ एप्रिल, २०१४ रोजी वयास ३ वर्षे पूर्ण असणारे बालक प्रवेशासाठी पात्र आहे. म्हणजे शाळेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या बालकाचा जन्म हा दिनांक २ एप्रिल, २०१० पासून ते दिनांक १ एप्रिल, २०११ अखेर या दरम्यान असणे आवश्यक आहे.

२) प्रवेश घेऊ इच्छित पालक आणि पाल्या हे पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान ३ वर्षे राहणारे/ वास्वव्यास असणे आवश्यक आहे.

३) पिवळे रेशनकार्ड धारक असलेल्या अल्पउत्पन्न गटातील बालकास प्रथम क्रमाने सरळ प्रवेश देण्यात येणार आहे.

४) मंगळवार दि. २१ ते शुक्रवार दि. ३१ जानेवारी २०१४ या काळात सकाळी १० वा. ते दुपारी १ वा. पर्यंत. (कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून) अर्जाचे मोफत वाटप राजीव गांधी ॲकॅडमी ऑफ ई–लर्निंग स्कूल, शिवदर्शन, पुणे ४११००९. या शाळेमध्ये करणे येणार आहेत.

५) वरील क्रमांक १ व २ अटीनुसार अर्जदार आणि पाल्य स्वत: राहत असलेल्या पत्त्याचा पुराव्याची झेरॉक्स प्रत, दिनांक १ एप्रिल, २०१४ रोजी पाल्याच्या वयास ३ वर्षे पूर्ण होत असलेल्या जन्म तारखेचा शासकिय दाखल्याची झेरॉक्स प्रत आणि पालकांचा लगतच्या वर्षाचा उत्पन्नाचा दाखला अशी कागदपत्रे अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. झेरॉक्स प्रतीवर अर्जदाराने स्वत:ची सही करणे आवश्यक आहे. तसेच तपासणीसाठी झेरॉक्स प्रतीच्या मूळ प्रती अर्ज सादर करताना उपलब्ध करुन द्याव्यात.

६) शुक्रवार दिनांक २४ जानेवारी २०१४ ते मंगळवार दिनांक ४ फेब्रुवारी २०१४ या काळात सकाळी १० वा.ते दुपारी १ वा.पर्यंत.(कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून) परिपूर्ण भरलेला अर्ज आणि त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रे असलेला असा अर्ज राजीव गांधी ॲकॅडमी ऑफ ई-लर्निंग स्कूल, शिवदर्शन, पुणे ४११००९. या ठिकाणी स्विकारण्यात येईल.

७) प्राप्त अर्जांची छाननी करुन अल्पउत्पन्न गटातील पिवळे रेशन कार्डधारकांच्या पाल्यांना सरळ प्रवेशाची यादी आणि पात्र व अपात्र अर्जांची छाननी यादी सोमवार दिनांक १० फेब्रुवारी, २०१४ रोजी सकाळी १० शाळेतील नोटीस फलकावर जाहिर करण्यात येईल.

८) अल्पउत्पन्न गटातील पिवळे रेशन कार्डधारकांच्या पाल्यांना सरळ प्रवेश देऊन ८० जागांपैकी उरलेल्या जागांसाठी पात्र यादीतील मुलांची निवडीसाठी सोडत/लकी ड्रॉ गुरुवार दिनांक १३ फेब्रुवारी, २०१४ रोजी सकाळी १० वा. शाळेतील साहित्य सम्राट विजय तेंडुलकर नाट्यगृहामध्ये मा. महापौर, पुणे महानगरपालिका यांचे हस्ते करण्यात येईल. पात्र अर्जधारकांनी स्वत: सोडत/लकी ड्रॉच्या वेळी सकाळी ९.४५ वा. साहित्य सम्राट विजय तेंडुलकर नाट्यगृह येथे उपस्थित असावे. लकी ड्रॉला येताना प्रवेश अर्ज सादर करतेवेळी देण्यात आलेली स्लिप/चिठ्ठी घेऊन येणे बंधनकारक आहे. ही स्लिप/चिठ्ठी नसेलतर प्रवेश दिला जाणार नाही. एका स्लिप/चिठ्ठीवर फक्त पालकांपैकी एकास प्रवेश दिला जाईल. याची नोंद घेण्यात यावी.

९) गुरुवार दिनांक १४ फेब्रुवारी, २०१४ रोजी ज्युनिअर केजी प्रवेशाची अंतिम यादी शाळेतील नोटीस फलकावर जाहिर करण्यात येईल.

१०)सोमवार दिनांक १७ ते शुक्रवार दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ या काळात सकाळी १० ते दुपारी १ यावेळेत पिवळे रेशन कार्डधारक आणि सोडत/ड्रॉमधुन निवड झालेल्यांच्या पाल्यांच्या पालकांनी स्वत: समक्ष त्यांनी अर्जासोबत जोडलेल्या झेरॉक्स कॉपिंच्या मूळ प्रती शाळेकडे सादर करुन प्रवेश निश्चित करावा लागेल.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक व तांत्रिक शिक्षण
पुणे महानगरपालिका